# फुगेवाडी येथे मेट्रो स्टेशन एफओबीच्या कामासाठी डायव्हर्जन

**पुणे, २७ऑगस्ट२०२० :**
पुणे मेट्रोचे काम पिंपरचिंचवड शहरात वेगाने चालु आहे. या विभागात मेट्रोचे काम अधिक तत्परतेने करण्यासाठी फुगेवाडी मेट्रो स्थानक ते सँडविक कंपनी येथील ग्रेड सेपरेटर रस्ता ( जुना मुंबई- पुणे थेट रस्ता ) दि. २७.०८.२०२० ते १०.०९.२०२० पर्यंत सकाळी ११.०० ते सांयकाळी ६.०० व रात्री ११.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या काळात बी.आर.टी.एस. मार्ग देखील बंद राहणार आहे. तरी नागरिकांना ही विनंती आहे की या काळात सर्व्हिस रोडचा वापर करावा व मेट्रो कामास सहकार्य करावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८
स्थापत्य बीआरटीएस विभाग
क्र.स्था/ बी.आर.टी.एस/५७७/२०२०
दि. २६/०८/२०२०

प्रति,
ACPM R-1 (Stations)
महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.,
१०१, ओरीयन बिल्डींग,
कोरेगाव पार्क पुणे-०१

विषय– Regarding Diversion of BRT road st Phugewadi Station for FOB column / footing work...

संदर्भ- आपले पत्र क्र.Maha Metro/ LR 1149 दि.२१/०८/२०२०

उपरोक्त विषयांकित बाबत मेट्रो स्टेशनचे कामासाठी फुगेवाडी येथे FOB column / footing चे कामासाठी बीआरटी रोड डायव्हरजन बाबत कळविले आहे. सदर जागेची पाहणी केली असुन वाहतुक सुरक्षेची योग्य ती काळजी घेऊन सदर काम करणेस मनपाची हरकत नाही.

तथापि, याबाबत वाहतुक पोलिसांच्या सल्यानुसार वाहतुकीचे योग्य नियोजन करावे व सुरळित व सुरक्षित वाहतुकीसाठी योग्य ती काळजी घेणेत यावी.सदरचे काम १५ दिवसांत पुर्ण करुन मनपास अवगत करणेत यावे.

कार्यकारी अभियंता
स्थापत्य बीआरटीएस
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत– मा. सह शहर अभियंता, बीआरटीएस स्थापत्य,
यांना माहितीसाठी सविनय सादर.